# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य,मध्यवर्ती इमारत,पुणे-४११ ००१.

web: www.dirhe.org E-mail: dirhe@pn2.vsnl.net.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/गभौशा/शिष्य/२०११-१२/१४अई 16086

दि. 1 JUL 2011

**परिपत्रक :-**

**अत्यंत तातडीचे.**

प्रति,

१. कुलसचिव,
राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

२. शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
सर्व विभागीय कार्यालय,महाराष्ट्र राज्य.

**विषय : गणित व भौतिकशास्त्र या विषयामध्ये विशेष प्रज्ञावान विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना नविन मंजूरी सन २०११-२०१२.**

**संदर्भ** : शासन निर्णय शिक्षण,क्रिडा व समाजकल्याण विभाग क्र.एससीएच-१४७०/१०७५२/एस, दि.१४.५.१९७१.

संदर्भांकित शासन निणर्याअन्वये सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षाकरिता गणित व भौतिकशास्त्र विषयामध्ये विशेष प्रज्ञावान विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.सोबत अर्जाचा नमुना,विद्यापीठ गुणवत्ता यादी नमुना जोडले आहेत.

२/- आपल्या विद्यापीठातील व विद्यापीठाचे कार्यक्षेत्रातील संलग्नित शासकीय/अशासकीय महाविद्यालयात गणित/भौतिकशास्त्र हा विषय घेऊन प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या प्रज्ञावान विद्यार्थ्यांची माहिती, सोबतच्या प्रपत्रात अचूक व परिपूर्ण भरुन या संचालनालयास **दि. ३१.९.२०११** पर्यंत पाठविण्यात यावी. कालमर्यादेची मर्यादा कटाक्षाने पाळावी. गणित/भौतिकशास्त्र शिष्यवृत्तीसाठी संबंधित विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक परीक्षेतील एकूण गुणांची सरासरी (टक्केवारी) ६० टक्के पेक्षा कमी असता कामा नये. प्रथम वर्ष पदवीसाठी गणित व भौतिकशास्त्र विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती विषयनिहाय (गणित/भौतिकशास्त्र) स्वतंत्र देण्यात यावी.

(कृपया मागे पहा)

३/- या शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यांना लवकरांत लवकर देता यावा म्हणून कृपया अर्जाचे त्वरित संकलन करुन **प्रस्ताव दि.३१.१०.२०११ पर्यंत या संचालनालयास प्रस्ताव विद्यापीठमार्फतच स्विकारण्यात येतील,त्यानंतर आलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाही.** सदर कार्यवाही कालमर्यादेत करण्यात यावी.

४/- याबाबतचे प्रस्ताव महाविद्यालयांनी परस्पर या संचालनालयास पाठवू नयेत अशा स्पष्ट सूचना आपल्या स्तरावर महाविद्यालयांना देण्यात याव्यात.महाविद्यालयाकडून परस्पर प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.परस्पर आलेले अर्ज दप्तरी दाखल केले जातील असेही महाविद्यालयांना कळविण्यात यावे.

**शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**
**यांचेकरिता.**

## नविन (प्रथम) राज्य सरकारच्या गणित व भौतिकशास्त्र विषयांच्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज

हा अर्ज दिनांक                    पूर्वी महाविद्यालयास मिळाला पाहिजे.तद्नंतर आल्यास विचार केला जाणार नाही.

१. अर्जदार विद्यार्थ्यांचे संपूर्ण नांव :

२. अर्जदार कोणत्या जमातीचा आहे :

अ. अनुसूचित जाती :

ब. अनुसूचित जमाती :

क. विमुक्त जाती :

ड. भटक्या जमाती :

२. प्रवेश कोणत्या शिक्षणक्रमासाठी व कोणत्या वर्गात घेतला. :

४. प्रवेश घेतल्याची तारीख :

५. मार्च/एप्रिल २०१९ मध्ये दिलेल्या परीक्षेसंबंधी माहिती. :

| परीक्षेचे नांव | परीक्षा घेणारे विद्यापीठ/ विभागातील शालांत परीक्षा | परीक्षेत मिळालेले गुण कितीपैंकी किती | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | गणित | |
| | | भौतिकशास्त्र | |

वरील माहिती संपूर्ण बरोबर आहे.मागणी करताच संबंधित कागदपत्रे हजर करीन.मला अन्य कोणतीही शिष्यवृत्ती मिळत नाही अथवा दुस-या शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला नाही.बी.एस्सी.भाग-१ शिक्षणक्रमासाठी मी गणित/विज्ञान (फिजिक्स) हा प्रमुख विषय घेणार आहे.

दिनांक :                                        विद्यार्थ्यांची सही

---

### कार्यालयाने भरावयाची माहिती

१. विद्यार्थ्यांचे दिलेली माहिती पडताळून पाहिली ती बरोबर आहे.

२. विद्यार्थ्यांची गणित/विज्ञान (फिजिक्स) विषयातील आवड व प्रगती ही त्या विषयातील असलेल्या शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यास योग्य आहे.

३. विद्यार्थ्यांविषयी विशेष शिफारस ( असल्यास)

प्राचार्य